Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक २९६ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.४ ऑगस्ट२०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

# गडचिरोलीतील विदारक चित्र

## गर्भवती महिलेसाठी खाटेची कावड करून दोन किलोमीटर पायपीट





**गडचिरोली । प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतर देखील गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात मुख्य रस्ते नदी नाल्यावर पूल नसल्याने पावसाळ्यात येथील नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात विविध आजाराचे रुग्ण आणि गरोदर मातांना याचा जबर फटका बसत आहे. जिल्ह्यातील कोरची तालुक्यात असंच एक विदारक चित्र समोर आलंय. कोरची तालुक्यातील चर्विदंड येथील एका गर्भवती महिलेला प्रसूती कळा आल्याने तिला खाटेचा कावड करून दोन किलोमीटर पायपीट करण्याची नामुष्की गावकऱ्यावर ओढवली. रोशनी शामराव कमरो (वय २३) असे त्या गर्भवती महिलेचे नाव आहे.

गडचिरोली जिल्ह्यात एकूण १२ तालुक्यांचा समावेश आहे. कोरची हा अतिदुर्गम,आदिवासीबहुल आणि नक्षलग्रस्त तालुका असून छत्तीसगड सीमेवर वसलेला तालुका आहे. या तालुक्यात बरेच गावांचा स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतर देखील पाहिजे तसा विकास झाला नाही. तालुक्यातील चर्वीदंड येथील सौ. रोशनी शामराव कमरो या गर्भवती महिलेला पहाटेच्या सुमारास अचानक प्रसुतीकळा सुरू होतात.गावालगत दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या लेकुरबोडी येथे उपकेंद्र आहे. मात्र,लेकुरबोडी जाण्यासाठी ना पक्का रस्ता...ना नाल्यावर पूल त्यामुळे गावात रुग्णवाहिका आणि इतर कुठलाही चारचाकी वाहन जाऊच शकत नाही. त्यामुळे तिच्या घरच्यांनी गावकऱ्यांच्या मदतीने खाटेची कावड करून लेकुरबोडी गाठले.

> कोरची तालुक्यातील अनेक गावात मुख्य रस्ते,नदी–नाल्यावर पूल नसल्याने अशीच परिस्थिती उद्भवली होती. सुदैवाने तिला जिल्हा मुख्यालयात हलविण्यात आले असले तरी वाटेत तिला अनेक अडचणींचा सामना करावा लागला.त्यामुळे जिल्ह्याची ही परिस्थिती केव्हा बदलणार असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

लेकुरबोडी येथून खाजगी वाहनाने कोरची तालुका मुख्यालयातील ग्रामीण रुग्णालयात तिला दाखल केले.येथील आरोग्य अधिकाऱ्यांनी आरोग्य तपासणी करून तिला गडचिरिलीसाठी रेफर केले. रुग्णवाहिकेने गडचिरोलीकडे जात असताना बेडगाव–पुराडा दरम्यान असलेल्या घाटमाथ्यावर भर रस्त्यात दोन ट्रक अडकून हा मार्ग अक्षरशः बंद होता. यावेळी रुग्णवाहिकेत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कुरखेडा येथून दुसरी रुग्णवाहिका बोलावून तिला गडचिरोली पाठविले. या दरम्यान तिला काही अंतर पायी चालत जावे लागले. गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात मुख्य रस्ते नदी नाल्यावर पूल नसल्याने सर्वसामान्यांसोबतच रुग्ण आणि गरोदर मातांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.नुकतेच २६ जुलै रोजी भामरागड तालुक्यातील भटपार येथील मालू केये मज्जी या ६७ वर्षीय जखमी पित्याला घेऊन मुलाला मित्राच्या मदतीने खाटेची कावड करून १८ किलोमीटर पायपीट करण्याची नामुष्की ओढवली होती. आता परत तीन ऑगस्ट रोजी हीच परिस्थिती कोरची तालुक्यात देखील बघायला मिळाली आहे.

## शेतातील गोठ्यात शिरून बिबट्याने केली वासराची शिकार

**सेलू । प्रतिनिधी**



सेलू तालुक्यातील बिबी शिवारात बीबट धुमाकूळ घालत असून शेतातील गोठ्यात असणाऱ्या जनावरांना भक्ष करीत आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शुक्रवारी रात्री शेतातून शेतकरी मनोज चंदनखेडे हे घरी आले व शनिवारी सकाळी शेतात गेले असता गोठ्यातील वासराचे लचके तोडल्या ने वासरू मृत्युमुखी झाल्याचे दिसून आले शेतकऱ्यांचे दहा हजार रुपयाचे जरी नुकसान झाले असले तरी शेतकऱ्यांचे असेच नुकसान होत असल्याने यावर वन विभागाने प्रतिबंध घालावा अशी मागणी होत आहे .

या अगोदर जखाळा शिवारात बिबट चां मुक्त संचार शेतकऱ्यांनी डोळ्यांनी पाहिला याही शिवारात अनेक जनावरांना भक्ष केले या शिवारात वन विभागाने कॅमेरे लावले त्यात बिबट दिसला पण पकडण्यात आला नाही आजही या शिवारात भीतीचे वातावरण आहे बिबी शिवाराला लागून जंगल आहे त्या मुळे या शिवारात वन्य प्राण्यांच्या मुक्त संचार असल्याने भीतीच्या वातावरणात शेतकऱ्यांना शेतातील कामेकरावेलागतआहे .

## भंडारा दौऱ्यात चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंवर केली टीका

**भंडारा । हंसराज रामटेके**

भंडारा – भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भंडारा जिल्ह्यातील दौऱ्यावर असताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली. उद्धव ठाकरेंनी दिल्लीतील रामलीला मैदानातून भाजपा विरोधात केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यांना प्रत्युत्तर देताना, बावनकुळे यांनी त्यांच्या वक्तव्यांचा जोरदार प्रतिकार केला.

उद्धव ठाकरेंनी दिल्लीतील आपल्या भाषणात भाजपावर जोरदार हल्लाबोल करत, आम्ही एका ढेकणाला नाही, संपूर्ण भाजपाला आव्हान देत आहोत असं म्हणत, भाजपाच्या धोरणांवर तीव्र आक्षेप नोंदवले होते. या टीकेला प्रत्युत्तर देताना, बावनकुळे म्हणाले की,

उद्धव ठाकरे ची सध्या मनस्थिती योग्य नाही आहे.त्यांना योग्य हॉस्पिटल योग्य डॉक्टर ची गरज आहे. हिंदू हुदय सम्राट संपला आहे.बाळासाहेब ठाकरे यांनी निर्धार केला होता की काश्मीरचा ३७० कलम हटयाला पाहिजे होता तर मोदी च्या नेतृवात ३७० कलम हटलं.हिंदू हुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे चा स्वप्न पूर्ण केल. अमीत भाई ला, देवेंद्रजी आणि भारतीय जनता पार्टीला चॅलेंज करत आहेत .उद्धव ठाकरे हे औरंगजेबी विचारचे झाले आहेत.उद्धव ठाकरे त्यांच्या



मस्तीकांमध्ये औरंगजेबी विचार घुसले आहेत.ज्यांना जे काही करायचे ते करावे.

आम्ही सुद्धा जनतेमध्ये जाऊन डबल इंजिन सरकारन जनतेच्या भल्यासाठी जे जे होत ते ते करु . आमच्या कडे ऐवढी मोठी तिजोरी आहे, आम्ही जनतेमध्ये जाऊन त्यांचे आशीर्वाद घेऊ. ज्यांना जे भुकायचं आहे ते भूखु द्या. एकदा जनतेनी लोकसभेमध्ये त्यांनी जे केलेले खोट्या पद्धतीचे आस्वाशन इथे ऐकले, जनतेमध्ये खोटं मांडलं मोदी जी बद्दल संविधान बदलणार आहेत आज मोदी ने संविधान हातात घेऊन पुन्हा देशाचे पंतप्रधान म्हणून काम सुरू केला. महिलांना सांगितलं बहिणींना सांगितलं साडेआठ हजार रुपये खटाखट खटाखट देऊ. तीन महिने झाले इथल्या खासदाराच आश्वासन होतं की ३० तारखेला साडेआठ हजार रुपये देऊ गायब झाले, खोटं बोलले त्यामुळे जनता कन्फ्युज झाली, त्यामुळे मला विश्वास आहे की उद्धव ठाकरे कितीही काही वाईट बोलले तरी महाराष्ट्राची जनता मात्र महायुती लाच मतदान करेल. तसेच, बावनकुळे यांनी भाजपा सरकारच्या डबल इंजिन उपक्रमाचं समर्थन करत सांगितलं की सरकार जनतेच्या कल्याणासाठी सातत्याने कार्यरत आहे. त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला महायुतीला मतदान करण्याचं आवाहन केलं आणि सांगितलं की महायुती सरकारने राज्यात अनेक विकासकामे केली आहेत.चंद्रशेखर बावनकुळे यांची ही टीका महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीमध्ये महत्त्वपूर्ण ठरली असून, आगामी निवडणुकांमध्ये ती कोणत्या पद्धतीने प्रभाव पाडेल हे पाहणं महत्त्वाचंठरेल.

## दिलमेश्वर ग्रामस्थ रस्त्या साठी उतरणार रस्त्यावर



**करमाळा–**तालुक्यातील अतिशय जाणीवपूर्वक दुर्लक्षित असलेले व तालुक्यातील धाराशिव च्या सरहद्दीवर असणारे शेवटचे करमाळा तालुक्यातील दिलमेश्वर हे गाव आहे .गावचे ग्रामस्थ अंकुशराव शेवंते यांनी सांगितले की या गावात साधारण तीनशे ते साडेतीनशे मतदार असून या गावाला सरपंच वाघाच्या वाडीचा , ग्रामपंचायत ऑफिस वाडीला ,सोसायटी चे चेअरमन बोरगावचे ,पोलीस पाटील वाडीचा ,ग्रामसेवक पांड्याचा,तलाठी मिरगव्हान चा अशी काहीशी या आमच्या गावाची अवस्था बिकट झाली आहे .त्यामुळेच विकास झाला नाही एकमेव कारण आहे .या गावात फक्त दोन वर्गखोल्या व दोन शिक्षक बस्स एवढेच गावात .

गावाला करमाळा बोरगाव ते दिलमेश्वर हा रस्ता पहिला तर आता पर्यंत चा शासनाचा पैसा पाण्यात गेला असेच म्हणावे लागेल .पाण्यात रस्ता की रस्त्यात पाणीहेकळतनाही.

# विकास कामात हयगय खपवून घेणार नाही–धर्मराव बाबा आत्राम

## मुलचेरा येथे तालुकास्तरीय आढावा सभा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी शासन कटिबद्ध असून पाहिजे तितका निधी देण्यात येत आहे.मात्र, येथील विकास कामांना गती मिळत नसल्याचे दर्शनास येत आहे.त्यामुळे आता विकास कामात दिरंगाई झाल्यास हयगय खपवून घेणार नसल्याचे राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. धर्मराव बाबा आत्राम यांनी अधिकाऱ्यांना खडसावून सांगितले.

मंत्री धर्मराव बाबा गेली चार दिवसापासून गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. शनिवार ३ ऑगस्ट रोजी ते मुलचेरा तालुका मुख्यालयातील तहसील कार्यालयात विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची आढावा सभा घेतली. यावेळी त्यांनी चांगलाच संताप व्यक्त केला. सुरुवातीलाच त्यांनी तालुका कृषी अधिकारी कडून विविध योजनांची तसेच अतिवृष्टीमुळे तालुक्यात झालेल्या शेतीच्या नुकसानीबाबत माहिती घेतली.त्यानंतर आरोग्य, शिक्षण,वन विभाग,महसूल,वीज वितरण विभाग,भूमी अभिलेख,सार्वजनिक बांधकाम विभाग,जिल्हा परिषद बांधकाम विभाग, ग्रामीण पाणी





पुरवठा विभाग सिंचाई विभाग, यासह आदी विभागांचा त्यांनी आढावा घेऊन सर्वसामान्यांना वेटीस धरल्यास संबंधितावर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहे.यावेळी तहसीलदार चेतन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष लीलाधर भरडकर,राकॉचे प्रदेश सचिव युनूस शेख, जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती युधिष्ठिर बिश्वास, सामाजिक कार्यकर्ते अरुण मुक्कावार आदी उपस्थित होते.

विशेष म्हणजे मागील एक ते दीड वर्षापासून मुलचेरा ते अल्लापल्ली या रस्त्याची चाळण झाल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचा साम्राज्य निर्माण झाला आहे.वास्तविक पाहता पावसाळ्यापूर्वीच हे खड्डे भरणे आवश्यक होते.मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे अक्षरशः दुर्लक्ष झाल्याने नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. याबाबत मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या आढावासभेत काही नागरिकांनी याची माहिती देखील दिली.मात्र,आढावा सभेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे (क्र.२) कार्यकारी अभियंता सुरेश साखरवाडे गैरहजर होते.त्यांनी शाखा अभियंत्यांना पाठवले होते. त्यामुळे मंत्री धर्मराव बाबा आश्रम यांनी नाराजी व्यक्त केली.आढावा सभेला गटविकास अधिकारी एल.बी. जुवारे, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विनोद म्हशाखेत्री,पेडिगुडमचे वनपरिक्षेत्र अधिकारी भावना अलोने,ठाणेदार अशोक भापकर यांच्यासह आदी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### आढावा सभेतून थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन

> दोन ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी अहेरी विधानसभा क्षेत्रातील विकास कामांचा आढावा घेतला होता.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ खड्डे बुजविण्याचे निर्देश दिले.मात्र खड्डे काही बुजविण्यात आले नाही आणि ३ ऑगस्ट रोजीच्या आढावा सभेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे (क्र.२) कार्यकारी अभियंता सुरेश साखरवाडे हे गैरहजर होते. रस्त्यावरील खड्ड्यांचा विषय निघाल्यावर ते गैरजर असल्याचे आढळल्यानंतर मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी सार्वजनिक बांधकाम मंडळचे अधीक्षक अभियंता नीता ठाकरे (मोहोळ) यांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क करून नाराजी व्यक्त केली तर थेट जिल्हाधिकाऱ्यांना यांना फोन करून कडक कारवाई करण्याचेनिर्देशदिले

# शेतकऱ्यांना कर्जमाफी व इतर मागण्यांसाठी बहुजन संघर्ष सेनेचे करमाळा तहसील कार्यालयासमोर निदर्शने

## तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**करमाळा । प्रतिनिधी**

बहुजन संघर्ष सेनेने सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे व इतर मागण्या साठी बहुजन संघर्षनेचे संस्थापक जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली विविध गावचे सरपंच व शेतकऱ्यांनी तहसील कचेरीसमोर निदर्शने करण्यात आली . शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळाली पाहिजे, वादळाने पडलेल्या केळीची नुकसान भरपाई मिळाली पाहिजे, तालुक्यातील कारखान्यांनी ऊस गाळपासाठी नेलेले उसाचे बिल एफआरपीप्रमाणे पूर्ण मिळाले पाहिजे, तहसील कचेरीतील पुरवठा विभागामधील सर्वर डाऊन आहे तो सुरळीत चालू करून रेशन कार्डच्याा संदर्भातील नावे समाविस्ट करणे ,नावे कमी करणे व नवीन रेशन कार्ड मिळणे व पात्र नवीन रेशन कार्ड अन्नसुरक्षेमध्ये समाविष्ट करून धान्य मिळण्याची व्यवस्था करावी, सातबारा दुरुस्तीचे अर्ज दोन वर्षापासून तहसील कचेरी मध्ये पडून आहेत ती कामे व्हावीत व दप्तर दिरंगाईची कारवाई व्हावी,मार्केट कमिटी करमाळा येथील निलाव मुका न करता बोलून



केला पाहिजे.

या सर्व मागण्या घेऊन बहुजन संघर्ष सेनेने करमाळा तहसील कचेरीसमोर भव्य निदर्शने केली त्यांनतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्या नावे नायब तहसीलदार गायकवाड यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले .त्यांनी स्वीकारले व वरिष्ठांना कळवतो असे सांगितले .याच्यावर आंदोलन कर्त्यांचे समाधान न झाल्याने राजाभाऊ कदम यांनी तहसीलदार यांना तहसील कचेरीतील सातबारा संबंधित व रेशन कार्ड संबंधित कामे एक महिन्यामध्ये सुरळीत करा अन्यथा शेतकऱ्यांना व नागरिकांना घेऊन तहसीलदार यांच्या खुर्चीला घेराव घालू असा इशारा दिला प्रशासनाला एक महिन्याची मुदत दिली तहसील कचेरीतील सर्व कामे सुरळीत मार्गी लागण्या साठी आंदोलन कर्त्यांनी मागण्याचे फलक हातातात घेऊन घोषणा देत परिसर दणणून सोडला.

आंदोलनात सहभागी शेतकरी कार्येकर्ते सोमनाथ देवकाते सरपंच आळसुंदे,अविनाश मोरे सरपंच खातगाव, भगवान डोंबले माजी सरपंच वाशिंबे,दत्ता चव्हाण साडे उपसरपंच, राजाभाऊ भोसले सरपंच राजुरी,गणेश रामचन्द्र घोरपडे सरपंच वारकातणे, अनिल मस्कर उपसरपंच वरकटणे, मनोहर कोलिंगे सरपंच पोंधवडी, विष्णू रंदवे सरपंच पोत्रे, नवनाथ राक्षे सरपंच दिलमेश्वर,आबा गायकावड, सुनील गरड, संतोष पाटील, बाप्पू रिटे पाटील, सुभाष गायकवाड, प्रताप पारेकर, सचिन कदम, प्रवीण भोसले, कल्याण कोठावळे, लालमन भोई, प्रदीप शिंदे, उत्तरेश्वर चव्हाण, नितीन गायकवाड, राजू शिंदे, आबा कदम , आप्पा भोसले, विक्रम कांबळे, जितेंद्र लांडगे, दादा थोरात, दत्ता राक्षे, बाबासाहेब कोपनर, रामा दुकळे, साहेबराव झिंजाडे महादेव कडाळे, हनुमंत खरात, चंद्रशेखर गाडे, निलेश पडोळे सागर मार्कड नितीन मारकड, भीमराव कदम, दिगंबर हजारे, अर्जुन भोसले मयूर शिंदे ,श्रीनिवास चौधरी, विकी कांबळे, महादेव काडाले,उतरेशोर चव्हाण,दीपक लोंढे,सिद्धार्थ गायकवाड,बाळू मस्तूद,रमेश भोसलेआदी उपस्थित होते .

# शिवणीतील शेतकऱ्यांना मिळाली केसर आंब्यांची झाडे

## आय.सी.आय.सी.आय. फॉऊंडेशनचा उपक्रम

**नागभीड । प्रतिनिधी**

सिंदेवाही तालुक्यातील शिवणी येथील शेतकऱ्यांना बुधवार दि.३१जुलै रोजी आय.सी.आय.सी.आय.
फॉऊंडेशनच्या वतीने विनामूल्य 'केसर' आंब्याच्या फळ झाडांचे वितरण करण्यात आले.याप्रसंगी आय.सी.आय.सी.आय.फॉऊंडेशनच्या डेव्हलपमेंट ऑफिसर रीता हटवार,कम्युनिटी फॅसिलेटर जितेंद्र मेश्राम,विनेश झोडे,शिवणी ग्रा.पं.च्या सरपंच पौर्णिमा चौके,रोजगार सेवक राजू पाकेवार, संगणक परिचालक प्रेमानंद बोरकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी आयसीआयसीआय फाउंडेशनचे कम्युनिटी फॅसिलेटर जितेंद्र मेश्राम यांनी शेतकऱ्यांना त्यांचा जीवनमान उंचावण्यासाठी आय.सी.




आय.सी.आय.फॉऊंडेशन कार्य करीत असून त्यांच्या विविध अशा योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली.मागील तीन वर्षांपासून आय.सी.आय.सी.आय. फॉऊंडेशन चंद्रपूर जिल्ह्यातील शेकडो हुन अधिक गावात काम करीत आहे. मात्र सिंदेवाही तालुक्यातील शिवणी हे गाव आय.सी.आय.सी.आय. फॉऊंडेशन तर्फे यावर्षी नव्यानेच दत्तक घेतले असल्याचे सांगितले.यावेळी आय.सी.आय.सी.आय.फॉऊंडेशनच्या डेव्हलपमेंट ऑफिसर रीता हटवार यांनी सुद्धा शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान या वर्षी शिवणी येथील शेतकऱ्यांना फॉऊंडेशनद्वारा कारले बियाणे व नेट सुद्धा अनुदान तत्वावर वाटप करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला गावातील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

# रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशी महाराष्ट्रातील रस्त्यांची अवस्था

## काँग्रेसच्या आंदोलनाची दखल सरकारने घ्यावी, टोलमुक्ती द्यावी–विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार

**नागपुर । प्रतिनिधी**

रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशी महाराष्ट्रातील रस्त्यांची अवस्था आहे. पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गाचे रेंगाळलेले विस्तारीकरण, रस्त्यावर पडलेले खड्डे यांमुळे वाहनधारकांना त्रास होत आहे.खड्ड्यांनी भरलेल्या महामार्गावर टोल का द्यायचा ? हा सवाल स्थानिक नागरिकांना पडला आहे. बेकायदेशीरपणे टोल वसुली सुरू असूनही सरकार आणि प्रशासन मुकाटपणे बसून उघड्या डोळ्यांनी सगळं बघत आहे असा आरोप करत महायुती सरकारने फक्त जाहीरातबाजी करण्याऐवजी राज्यातील रस्त्याकडे लक्ष द्यावे व काँग्रेसच्या आंदोलनाची दखल घेत टोलमुक्ती द्यावी अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. श्री वडेट्टीवार म्हणाले, कोल्हापूर सांगली, सातारा, पुणे काँग्रेस कमिटीच्या वतीने किणी, तासवडे, आनेवाडी, खेड शिवापूर येथील टोल नाक्यांवर काँग्रेस कार्यकर्त्यांचे आंदोलन सुरू आहे. पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गाचे रेंगाळलेले विस्तारीकरण, रस्त्यावर पडलेले खड्डे यांमुळे वाहनधारकांना त्रास होत आहे. खड्ड्यांनी भरलेल्या महामार्गावर टोल का द्यायचा ? हा सवाल स्थानिक नागरिकांना पडला आहे. बेकायदेशीरपणे टोल वसुली सुरू असूनही सरकार आणि प्रशासन मुकाटपणे बसून उघड्या डोळ्यांनी सगळं बघत आहे.

जनतेच्या या समस्येकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेसने आंदोलन सुरू केले आहे. महायुती सरकारने झोपेतून आतातरी जागे व्हावे असे म्हणत महायुती सरकारने फक्त जाहिरातबाजी करण्याऐवजी राज्यातीलरस्त्याकडे लक्ष द्यावे असे वडेट्टीवार म्हणाले.कंत्राटदार काम करत नाहीत, त्यांचे पैसे थकले आहेत.जीव मुठीत घेऊन प्रवास करणाऱ्यावर टोलचा मारा मात्र होत आहे.

मुंबई बंगळूर राष्ट्रीय महामार्गचे कामकाज रेंगाळले आहे म्हणून आज काँग्रेसच्या नेत्यांनी आंदोलन केले आहे, टोल हवाच कशाला?असा सवाल करत वडेट्टीवार म्हणाले की,रस्तेच सुरक्षित नाही ,सर्व काम रेंगाळली आहे पण टोल वसुली मात्र सुरू आहे म्हणून काँग्रेसच्या आंदोलनाची दखल सरकारने घ्यावी व टोलमुक्ती द्यावी.

# अभय योजने च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एक खिडकी उपक्रम सुरु करा–आ.किशोर जोरगेवार

## जिल्हाधिकारी यांना सूचना,नझूल धारकांना होणार योजनेचा लाभ

**चंद्रपूर। प्रतिनिधी**

नागपूर व अमरावती विभागातील निवासी कारणांसाठी भाडेतत्त्वावर दिलेल्या जमिनींसाठी विशेष अभय योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करत नझुल धारक नागरिकांना या योजनेचा लाभ घेता यावा यासाठी एक खिडकी उपक्रम सुरु करा अशा सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांना दिल्या आहे.

अतिवृष्टीमुळे नागरिकांचे झालेले नुकसान, भुस्खलनाच्या घटना आणि मतदार संघातील विकास कामांसदर्भात आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विनय गौडा यांची भेट घेतली आहे. यावेळी त्यांनी सदर सुचना केल्या असून एका आठवड्यात अभय



योजनेकरिता एक खिडकी उपक्रम सुरु करण्याचे जिल्हाधिकारी यांनी म्हटले आहे.

ज्या नझूल जमिनी निवासी कारणासाठी लिलावाद्धारे, प्रीमियम अथवा अन्यप्रकारे भाडे तत्त्वावर दिल्या आहेत, त्यांनाच अभय योजना ३१ जुलै २०२५ पर्यंत लागू राहणार आहे. नझूल जमिनीच्या भोगवटादार- १ करण्यासाठी जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील बाजारमूल्याच्या २ टक्के एवढा प्रीमिअम आकारण्यात येणार आहे. तर फ्री होल्ड करण्यासाठी अन्य अटी शर्ती कायम राहणार आहे. नझूल जमिनीचे वार्षिक भूभाड्याची आकारणी प्रचलित दराने ३१ जुलै २०२५ पूर्वी कालमर्यादित भरणे अनिवार्य असेल. त्यानंतर भूभाडे न भरल्यास थकीत भूभाडे व त्यावर वार्षिक १० टक्के व दंडनीय व्याज आकारण्यात येईल, असे निर्णय महाराष्ट्र शासणाच्या वतीने घेण्यात आले आहे.त्यानुसार नझुल जागेसाठी सदर अभय योजना ही दिनांक ३१ जुलै २०२५ पर्यंत मर्यादित आहे. अश्या परिस्थितीत नागरिक सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रशासनाकडे गेले असता या संबधित यंत्रणा नसल्याने कागदपत्रांची पूर्तता करतांना नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी आवश्यक कर्मचारी उपलब्ध नाही. त्यामुळे मागील चार महिन्यापासून एकही नागरिकांना या लोकहित अभय योजनेचा लाभ मिळालेला नाही. समर्पित कार्य यंत्रणा अस्तित्वात नसल्याने सदर योजनेचा लाभ नागरिकांना वेळेत घेणे शक्य होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहे. चंद्रपूर मनपा कार्य क्षेत्रात १३००० च्या वर नझुल धारक आहे. त्यामुळे सदर योजना प्रभावीपने राबविण्यात यावी अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली असून नागरिकांना नझुल जमिनीसाठी लोकहित विशेष अभय योजने च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समर्पित दालन (एक खिडकी योजना) तयार करून आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती तातडीने करण्याच्या सुचना त्यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांना दिल्या आहेत.

# राज्यात ४ दिवस मुसळधार पावसाचा इशारा विश्रांती नंतर जोर पुन्हा वाढणार

**मुंबई**–राज्यात पुढील चार दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने विदर्भ, कोकणात पावसाचा जोर वाढणार आहे. यामुळे कोकणातील जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर विदर्भासह मुंबई, ठाणे पालघरमध्ये यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील चार दिवस म्हणजेच १ ते ४ ऑगस्ट या काळात राज्यात चांगल्या पावसाचा अंदाज आहे.गेल्या काही दिवसांपासून राज्यात मुसळधार पाऊस कोसळत होता. त्यानंतर पावसाने विश्रांती घेतली होती. आता दोन ते तीन दिवसांच्या विश्रांतीनंतर राज्यात पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज आहे. मान्सूनचा यंदाचा अंदाज आला तेव्हाव्ही ऑगस्ट ते सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता.हवामान खात्याकडून मुंबईसह कोकणात, पश्चिम महाराष्ट्र तसेच विदर्भामध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर नागरिकांनी काळजी घेण्याचे, प्रवास टाळण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी जिल्हे, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांचा घाटमाथा आणि विदर्भातील गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांत जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. तर ठाणे, मुंबई, सिंधुदुर्ग, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा यलो अलर्ट आहे. उर्वरित राज्यात ढगाळ आकाशासह पावसाच्या हलक्या शक्यता आहे.

# अवयदान! तुम्ही वाचू शकता एखाद्या रुग्णाचे प्राण

## रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती

**चंद्रपूर। प्रतिनिधी**

शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, चंद्रपूर अंतर्गत समाजसेवा विभागाद्वारे भारतीय अवयवदान दिनानिमित्त आज (दि.३) रॅली काढण्यात आली. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांनी 'अवयदान! श्रेष्ठदान....तुम्ही वाचवू शकता एखाद्याचे प्राण' अशा घोषणा नागरिकांमध्ये जनजागृती केली.

सदर रॅलीला अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, जिल्हा विधी सेवा प्राधीकरणचे सचिव सुमित जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. यावेळी अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे उपस्थित होते.

सदर रॅली जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर-जटपुरा गेट-हॉटेल सेलिब्रेशन-शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसर, रामनगर अशी मार्गक्रमण केल्यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या मार्गदर्शनाखाली समारोपीय कार्यक्रम पार पडला.




भारतीय जनतेमध्ये अवयवदानाबददल जनजागृती करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या आदेशान्वये ११ जुलै ते ३ ऑगष्ट २०२४ या कालावधीत विविध स्पर्धेचे आयोजन करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. या अंतर्गत पोस्टर्स स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, कविता स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, स्लोगन स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविन्यात आले.यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी रुढी, प्रथा, परंपरांना आडकाठी देउन मोठ्या प्रमाणात अवयवदान चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले. जिल्हा विधी सेवा प्राधीकरणचे सचिव सुमित जोशी यांनी अवयवदानाबाबत असलेले गैरसमज सोडून प्रत्येकाने अवयवदान करावे, असे आवाहन केले.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे यांनी अवयवदान काळाची गरज असून प्रत्येकाने अवयवदानास संमती देण्याचे आवाहन केले. संचालन समाजसेवा अधिक्षक राकेश शेंडे आणि हंमत भोयर यांनी तर आभार समाजसेवा अधिक्षक उमेश आडे यांनी मानले. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. निवृत्ती जीवने, उपवैद्यकीय अधिक्षक डॉ. कुलेश चांदेकर, सर्जरी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. दिपा जहांगिरदार, औषधवैद्यकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुनिल भैसारे, वधिरिकरणशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. बूले, जीवरसायनशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. रजनी तोरे, शासकीय नर्सिंग कॉलेजच्या ट्युटर रिना कन्नाके उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता अवयवदान शपथ घेऊन करण्यात आली.सदर रॅलीमध्ये या शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शासकीय परिचर्या महाविद्यालय, विमलादेवी आयुर्वेदीक महाविद्यालय, पुरुषोत्तम बागला होमिओपॅथी कॉलेज, सुशिलाबाई मामीडवार समाजकार्य महाविद्यालय, एफ.ई.एस. गॅर्ल्स कॉलेज च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

# श्री वैष्णव शिंपी समाजाच्या वतीने श्री संत नामदेव महाराज पुण्यतिथी निमित्त ज्येष्ठ नागरिक आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन

## ज्येष्ठांचा सन्मान करणारा समाज, संस्कृतीच्या वैभवाचे प्रतीक–आ.किशोर जोरगेवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जगात वाढती वृद्धाश्रम मानव धर्म संकटात आल्याचा प्रत्यय घडवत आहेत. मात्र श्री वैष्णव शिंपी समाजाच्या वतीने श्री संत शिरोमणी नामदेव महाराज पुण्यतिथीचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार केला जात आहे. आपण दरवर्षी समाजातील ज्येष्ठांचा सत्कार करता. जो समाज ज्येष्ठांना सन्मान देतो, तो समाज कधीच मागे राहू शकत नाही. आपण संत शिरोमणी नामदेव महाराजांचे खरे पाईक असून, ज्येष्ठांचा सन्मान करणारा शिंपी समाज संस्कृतीच्या वैभवाचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

श्री वैष्णव शिंपी समाजाच्या वतीने शिंपी समाज भवन येथे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज पुण्यतिथी निमित्त ज्येष्ठ नागरिक आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. या कार्यक्रमाला समाजाचे अध्यक्ष सुहास बहादे, उपाध्यक्ष संजय तुरिले, सचिव प्रवीण जोगडे, कोषाध्यक्ष नरेश रेभनकर, प्रदीप जुमडे, शिलाताई पिंझनकर, कपीश कोहडे, अविनाश रेभनकर, संजय टिकले, बल्लू जुमडे, राजू लांडे आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, शिंपी हा कष्टकरी समाज आहे. आपण नेहमी समाजाची सेवा केली आहे. मात्र समाजाने आता आपला हक्क मागण्यासाठी पुढे आले पाहिजे. या समाजात प्रतिभावंत विद्यार्थी आहेत. आपण शिक्षण क्षेत्रात समाजाचे नाव उज्ज्वल करावे. आज ज्येष्ठ नागरिकांचा येथे सत्कार केला जात आहे. ज्येष्ठांच्या अनुभवी विचारांचाही समाजाला नक्कीच फायदा होणार आहे. समाजात ज्येष्ठांचा सन्मान व्हायला पाहिजे. आपण ज्येष्ठ नागरिकांना जुन फर्निचर सिनेमा दाखवला. यावेळी ज्येष्ठांसोबत अधिकचा सहवास लाभला आणि त्यातून अनेक गोष्टी शिकता आल्याचे आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

श्री नामदेव महाराजांनी आपल्या जीवनातून समाजातील विषमता, अज्ञान आणि अंधश्रद्धा दूर करण्याचे कार्य केले. त्यांनी आपल्या विचारांमध्ये एकात्मता, श्रद्धा आणि सेवाभावाचे महत्त्व दिले. त्यांच्या कीर्तनातून त्यांनी भक्तांमध्ये ईश्वरप्रेम, सेवा आणि एकात्मतेचा संदेश दिला. ईश्वर सर्वत्र आहे, तो आपल्या हृदयात आहे, असे ते म्हणत, आणि या विचाराने त्यांनी समाजातील प्रत्येकाला ईश्वराच्या प्रेमात रंगवले.

आज आपण त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांचे आशीर्वाद घेतो, त्यांची शिकवण आपल्या जीवनात आणण्यासाठी संकल्प करतो. त्यांच्या जीवनात जसे ते समाजसेवेसाठी आणि धर्मसेवेसाठी तत्पर होते, तसेच आपणही आपल्या समाजातील गरजूंच्या सेवेसाठी आणि ईश्वराच्या मार्गावर चालण्यासाठी प्रेरित होण्याची गरज असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# उपजिल्हा रूग्णालय वरोरा येथे जागतिक स्तनपान सप्ताह चे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

राष्ट्रीय माता बाल संगोपन कार्यक्रम व केअर कंपॅनियन प्रोग्रॅम अंतर्गत दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट दरम्यान आरोग्य विभागामार्फत महिलांसाठी स्तनपान जनजागृती सप्ताह राबविण्यात येतो. यावर्षी दि.१ ते ७ ऑगस्ट दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात 'शून्य मातामृत्यू व बालमृत्यू' या संकल्पनेतून सर्व आरोग्य संस्थेत 'स्तनपान जनजागृती सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे.



या वर्षीची थीमआहे आई आणि बाळामधील अंतर कमी करुया स्तनपानाला समर्थ देऊ या वरील विषयास अनुसरून उप जिल्हा रूग्णालय वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे जागतिक स्तनपान सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.हा कार्यक्रम डॉ. प्रफ्फूल खूजे वैद्यकीय अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली वंदना बरडे अधीसेवीका यांनी आयोजित केला होता.या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर डॉ .अश्विनी गेडाम स्त्रीरोगतज्ज्ञ, वंदना बरडे अधीसेवीका व गितांजली ढोक आहारतज्ञ उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.वंदना बरडे अधीसेवीका यांनी जागतिक स्तनपान सप्ताह कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले त्यात त्यांनी जागतिक स्तनपानाचे काय महत्त्व आहे हे हिरकणी च्या कथेद्वारे समजून सांगितले.स्तनपान करने खूप पुण्याचे कामं आहे.स्तनपान केल्यामुळे आईचा बऱ्याच रोगापासून बचाव होतो.एक सत्कर्म केल्याचं समाधान मीळते.तसेच आपणास विनंती करण्यात येत आहे की आपण आपल्या बाळाला प्रत्येक वेळी स्तनपान त्यांच्या मागणीप्रमाणे करावे. रुग्णालयामध्ये पुढील ७ दिवसांमध्ये राबविण्यात येणाऱ्या स्तनपान सप्ताह मध्ये वेगवेगळ्या थीम अनुसार केअर कंपॅनियन प्रोग्रॅम अंतर्गत वापरले जाणारे साधने (फ्लीप-चार्ट, थाळी, डॉल, ब्रेस्ट मॉडेल, टेकवे) यांच्या मदतीने सत्रे आयोजित करून जास्तीत जास्त महिलांना स्तनपानाचे महत्व समजावून सांगण्यात येणार आहे.डॉ अश्वीनी गेडाम स्त्रीरोगतज्ज्ञ यांनी स्तनपानाविषयी मार्गदर्शन केले त्यात त्यांनी आई आणि बाळाच्या स्तनपानाबद्दल आरोग्याची माहिती दिली.गितांजली ढोक यांनी आहाराबाबत मार्गदर्शन केले.मीना मोगरे यांनी दुध पाजण्याच्या पध्दतीचे प्रात्याक्षीक करून दाखविले.रुबिना खान यांनी सुत्र संचालन केले.व आभारप्रदर्शन प्रणाली गेडाम यांनी केले. कार्यक्रमाला वंदना बरडे अधीसेवीका, रूबिना खान, सुनंदा पुसनाके , सरस्वती कापटे,कल्यानी कस्तुरे,मीना मोगरे, कूंदा मडावी यांनी परिश्रम घेतले व सर्व अधिकारी व कर्मचारी मीळून स्तनपान सप्ताहाचा उद्घाटनाचा पहिल्या दिवसाचा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला.या कार्यक्रमात एकुन ५० मातांनी याचा लाभ घेतला.

# मातंग समाज संघटनेद्वारा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. मातंग समाज संघटना चंद्रपूरच्या वतीने दि. ०१ ऑगस्ट २०२४ रोजी दु. १.३० वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात आयोजित जयंतीउत्सव समाजाच्या ज्येष्ठ समाजसेविका रत्नमाला बावने यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमास अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त राजु येले, सुनिल डालवनकर, सुष्मा डालवनकर, गौरव पारधे, अरुणकुमार कांबळे, बाळु कोतपल्लीवार, चांद सय्यद रंजीता डोंगरे व अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या महिला पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी अण्णाभाऊंच्या जीवनचरीत्रावर प्रकाश टाकुन त्यांनी उपेक्षीतांच्या उत्कर्षासाठी संपुर्ण जीवन खर्ची घातल्याचे सांगुन मातंग समाज बांधवांनी अण्णाभाऊंच्या विचारांचा वारसा स्वीकारून स्वतःची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक उन्नतीकरीता प्रयत्न करण्याचे आवाहन वक्त्यांनी केले.कार्यक्रमास रविंद्र डोंगरे, नितेश पडघाने, पत्रकार बावने, बाळु डोंगरे, अमर मेंढे, सतिष डोंगरे, सिध्दार्थ येले, बजरंग वानखेडे, अशोक वानखेडे, विजू आमटे, साजन चहारे, गोपाल पडघाने, शारदा गवळी, विमलबाई डोंगरे, सुनिता येले, सुदराबाई पोटफोडे, आशा डोंगरे व अन्य समाज बांधवांची उपस्थिती लाभली होती.कार्यक्रमाच्या सुरूवातीस उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्माफुले, राजश्री शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कांतीवीर लहूजी साळवे, अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.




# बाबा ताजुद्दीन यांच्या उर्स निमित्त महाप्रसाद वाटप

**वरोरा । प्रतिनिधी**

बाबा ताज सरकार ग्रुपच्या वतीने हजरत बाबा ताजुद्दीन उर्स निमित्त हजरत सय्यद बाबा जहीरुद्दीन चिस्ती दर्गा बाबाची मजार व ताजुद्दीन बाबा च्या फोटोला फुलाची चादर चढवून व लंगर महाप्रसाद वितरित करून बाबाचा उर्स डॉ .बाबासाहेब आंबेडकर चौक येथे साजरा करण्यात आला.




यावेळी मोठ्या संख्येने भावी भक्त नागरिक यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. आपल्या महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत अवलिया बाबा ताजुद्दीन हे एकतेचे प्रतीक आहे सर्व समाजाचे भावीभक्त नागरिक यांचे विविध कार्यक्रम उत्सव मोठ्या प्रमाणात करून गोरगरीब नागरिकांना भोजन दान करतात . आपल्या वरोरा शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील हजरत सय्यद बाबा जहीरुद्दीन चिस्ती यांच्या दर्गा परिसरात सदर कार्यक्रम शांततेत पार पडला यावेळी अनेक मान्यवर व मोठ्या प्रमाणे नागरिकउपस्थितहोते.

# अखेर टेमुर्डा-डोंगरगाव रस्त्यावरील काटेरी झुडपे हटवली

## सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र देठे यांच्या मागणीला यश





**वरोरा । प्रतिनिधी**

टेमुर्डा ते डोंगरगाव या रस्त्यावर काटेरी झुडपे मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आले होते त्यामुळे अनेक अपघात सुद्धा या रोडनी झाले अपघाताचे सत्र दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे टेमुर्डा येथील सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र देठे यांनी रस्त्यावरील काटेरी झुडपे हटविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अभियंता यांची भेट घेऊन टेमुर्डा- डोंगरगाव -चिकणी रोडवरची झाडे हटवण्यात यावी तसेच रोडवरील पडलेले खड्डे बुजवण्यात यावे यावर सखोल चर्चा करण्यात आली. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर यावर येत्या चार दिवसात काम पूर्ण करू असे आश्वासन बांधकाम विभागाकडून दिले व ते काम पूर्ण सुद्धा झाले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते निळकंठ आमटे, मिलिंद भोयर ,समीर देठे ,सचिन भोयर ,अनिकेत झिले, निखिल तिखट, अभय आसुटकर, सुजित खीरटकर, रोशन ठाकूर हे सर्व उपस्थित होते.

**या रोडने शाळकरी मुले येत**



**असतात नेहमी अपघाताचे सूत्र चालू असल्यामुळे माझ्या निर्दशनात आले म्हणून आम्ही बांधकाम विभागाचे लोहे साहेब यांची भेट घेऊन हे काटेरी झुडूप साफ करण्यास सांगितले याची दखल बांधकाम विभागाने तात्काळ घेऊन काटेरी झुडूप सापकेले.**

सामाजिक कार्यकर्ते
सुरेंद्र देठे

# ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने बल्लारपूर येथील व्यायामशाळा आणि आर.ओ. मशीनकरीता निधी वितरीत

## व्यायामशाळेकरीता ४८ लक्ष ५२ हजार तर आर.ओ. मशीनकरीता १० लक्ष रुपये मंजूर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात पायाभूत सुविधांसोबतच आरोग्य, शिक्षण, कृषी, सिंचन, क्रीडा आदींचे जाळे उभारण्यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यांच्या पुढाकारानेच नाविण्यपूर्ण योजनेंतर्गत बल्लारपूर येथील व्यायामशाळेकरीता ४८ लक्ष ५२ हजार तर विसापूर येथील क्रीडा संकूलात आर.ओ. मशीन करीता आमदार निधीतून १० लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ या वर्षात नाविण्यपूर्ण योजनेंतर्गत १४ कोटी ४६ लक्ष रुपये (३.५ टक्के) शासनाकडून अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. या योजनेतून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष पुढाकाराने बल्लारपूर येथील झाकीर हुसेन वॉर्डातील व्यायामशाळेच्या पहिल्या माळ्यावर अत्याधुनिक सभागृह, मेडीटेशन म्युजीक व इतर बांधकामाकरीता ४८ लक्ष ५२ हजार रुपये ऐवढ्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

विसापूर ता. बल्लारपूर येथील तालुका क्रीडा संकूल येथे खेळाडूंना पिण्याचे शुध्द पाणी मिळण्यासाठी आर.ओ संयंत्र बसविण्याकरीता आमदार निधीतून १० लक्ष रुपये मंजूर झाले असून सदर निधी तातडीने वितरीत करण्यात आला आहे. व्यायामशाळा आणि आर.ओ. करीता निधी मंजूर केल्यामुळे युवक तसेच खेळाडूंनी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.



**जावक क्रमांक १८०१/२०२४**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, चंद्रपूर**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**चंद्रपूर,मधुबन प्लाझा, मुदा रोड**
**शिवाजीनगर , चंद्रपूर , चंद्रपूर ,चंद्रपूर**
**दिनाक :-०२.०८.२०२४**

## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन.क्रमांक : CDP/12077/18/24
फेरफार अर्ज क्रमांक :३९/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक ऋत्र श्री पार्श्र् जीवदयामैत्री धाम (गौशाला) भद्रावती ता .भद्रावती ,जि. चंद्रपुर बाबत
न्यासाचा पत्ता : श्री पार्श्र् नाथजैन मंदिर ,भद्रावती, भद्रावती,चंद्रपूर ,भद्रावती,भद्रावती
अर्जदार :ॲड .श्री प्रमोदबाबू सुगनचंद्रजी बोथरा .
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त , चंद्रपूर हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ङ्ग सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९६० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि संदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२)खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Declaration Of Trust (trust fund ) | 11000.00 |

(अ) जंगम मिळकतः रोख रु. ११०००/- मात्र
(अक्षरी रुपये अकरा हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्ण)**

| अ.क्र. | शहर किंवा गाव अंदाजे मूल्य | सी.एस किंवा क्षेत्र महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | मूल्याकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप |
|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकतः रोख रु. ०/- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेच असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिदिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पाट्यावर अशा रितीने पाठवावी .त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही . तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाबाबत योग्य ते आदेश दिल्या जाईल .

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्या निशी आज दिनांक ०२ -०८ -२०२४ रोजी दिले .

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी**
**कार्यालय चंद्रपूर**

# सातत्याने गरजूना मदत पुण्याईचे कार्य कौतुकास्पद–छोटूभाई शेख

## विद्यार्थ्यांना स्नेहभोजन व वृक्षारोपण;पुण्याई फाउंडेशन ग्रुप व हरित मित्रपरिवाराचा उपक्रम







**वरोरा | प्रतिनिधी**

समाजकार्याचा एक भाग म्हणून सातत्याने गरजुंना मदतीचे पुण्याई फाउंडेशन ग्रुप चे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोदगार माजी पाणीपुरवढा सभापती नगरपरिषद वरोरा छोटूभाई शेख यांनी काढले.ज्यांच्याकडे खूप काही आहे त्यांनी त्यातला काही भाग वंचितांसाठी खर्च करावा आणि त्या माध्यमातून शालेय विद्यार्थी , अनाथ , दिव्यांग , निराधार , आर्थिक परिस्थिती मुळे प्रवाहातून बाजूला पडलेली मुलं यांना आधार द्यावा असेही छोटू भाई म्हणाले.

पुण्याई फाउंडेशन ग्रुप वरोरा व हरित मित्र परिवार वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने ०३ ऑगस्ट रोज शनिवारला शहरालगत असणाऱ्या मोहबाळा येथील विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजन व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्या प्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी पुण्याई फाउंडेशन ग्रुपचे संस्थापक प्रकाश खरवडे , हरित मित्र परिवार वरोरा चे अध्यक्ष किशोर उत्तरवार,मोहबाळा येथील ग्रामपंचायत सरपंच नंदू टेमुर्डे,उपसरपंच शेवंता मोडक,जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता गायकवाड , साईनाथ कॉन्व्हेंट च्या शिक्षिका योगिता सोनकुवर,पल्लवी लोहकरे, प्रेरणा पेटकर , सामाजिक कार्यकर्ते देविदास ताजने,माजी उपसरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्य दिलीप काळे , इत्यादी मान्यवर उपस्थित होते . या कार्यक्रमाचे संचलन पुण्याई फाउंडेशन चे सदस्य राजेंद्र जुमनाके यांनी केले. पुण्याई फाउंडेशनचे संस्थापक प्रकाश खरवडे यांनी संस्थेच्या उपक्रमांची व संस्थेच्या कार्यप्रणाली ची इतंभूत माहिती उपस्थितांना दिली . सरपंच नंदू टेमुर्डे यांनी संस्थेच्या उपक्रमांची स्तुती केली भावी वाटचाली करीत शुभेच्छा दिल्या.मान्यवरच्या मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी मिष्ठान्न भोजनाचा आनंद घेतला. त्यांनतर गावा बाहेरील स्मशानभूमीत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले .

या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता पुण्याई फाउंडेशन गृप वरोरा चे पवन वरघने, निलेश आंबुलकर, दीपक मते , सुमित वनकर , सुनील झिलगिलवार , क्रिष्णा शेंडे , रवी खुटाडळकर , आकाश टिपले , रितिक पारखी ,सतीश थेरे, अभय ठेंगणे, करीमलाला ,रवी खुटाळकर व हरित मित्र परिवार वरोराच्या सदस्यांनी अथक परिश्रम घेतले .

# पिक विमा अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी धरले धारेवर

## गोंडपिपरित पिक विमा आढावा बैठक संपन्न

**गोंडपिपरी | प्रतिनिधी**

राज्य शासनाने मोठा गाजावाजा करून एक रुपयात पिक विमा योजना सुरू केली.पीक विम्याचे काम सांभाळत असलेल्या कंपन्या छोटी–मोठी कारणे समोर करून पिक विम्याचे दावे खारीज करीत असल्याचे चित्र आहे २३– २४ सत्रात चंद्रपूर जिल्ह्यातील पिक विमा काढलेल्या ६९ हजार २४४ शेतकऱ्यांचे दावे पीक विमा कंपनीने खारीज केले यावर कृषी विभागाने आक्षेप घेतला आहे.

गेल्या काही वर्षापासून नैसर्गिक आपत्ती ,निसर्गाचा लहरीपणा याचा मोठा फटका शेत पिकांना बसत आहे.पिकांना संरक्षण मिळावे या उद्देशाने राज्य शासनाने पीकविमा योजना सुरू केली गेल्या काही वर्षांपासून हेक्टरी रकमेची अट शिथिल करण्यात आल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा आहे .त्यात गेल्या दोन वर्षापासून राज्य शासनाने केवळ एकूण एक रुपयात पिक विमा योजना सुरू केली त्याला शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे .पिक विमा योजनेची कामे जिल्हा निहाय इन्शुरन्स कंपन्यांना देण्यात आली आहे. चंद्रपूर



जिल्ह्याचे काम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडे सोपवण्यात आले.अशा स्थितीत गोंडपिपरी तालुक्यातील ४१०२ शेतकऱ्यांचे दावे विमा कंपनीने खारीज केले.आज तहसील कार्यालय व तालुका कृषी विभागाने डी येड कॉलेज येथील सभागृहात दि २ शुक्रवारी आढावा बैठक ठेवण्यात

> **येत्या पाच ऑगस्ट रोजी जिल्हा प्रशासनाची पिक विमा कंपनीसोबत बैठक होणार आहे या बैठकीतून तोडगा निघेल आम्ही सुधा शेतकऱ्यांच्या प्राप्त तक्रारी जिल्हा स्तरावर पोहचवू**
>
> **– शुभम बहाकर ,तहसीलदार गोंडपिपरी**

आली.या वेळी तहसीलदार शुभम बहाकर,तालुका कृषी अधिकारी सचिन पानसरे,दिनेश लडी जिल्हा सल्लागार विमा कंपनी, तलाठी दीपक झाडे, साईकिरन आऊलवार नायब तहसीलदार,अनिकेत चावरे यांची उपस्थिती होती.शेतकऱ्यांतर्फे सरपंच देविदास सातपुते,शिवसेना तालुका प्रमुख सुरज माडुरवार,प्रवीण धोडरे,कॉंग्रेस शहर अध्यक्ष राजू झाडे,बंडू गौरकार,पारगाव येथील शेतकरी विरुटकर,संजय माडूरवार यांनी प्रश्न मांडले.यावेळी शेकडो शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## करमाळा तालुक्यातील जनतेसाठी दत्त कला परिवार सदैव तत्पर–मायाताई झोळ



**करमाळा | प्रतिनिधी**

करमाळा तालुका दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिवा मायाताई झोळ यांनी ०३ ऑगस्टला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दिलमेश्वर येथे सदिच्छा भेट दिली .शाळेची गुणवत्ता शैक्षणिक वातावरण पाहून समाधान व्यक्त केले .झोळ फाउंडेशन तर्फे प्रत्येक विद्यार्थ्यास वह्या व पेन भेट दिल्या.

यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्षा,सर्व सदस्य, सर्व माता पालक,तरुण वर्ग ,पालक उपस्थित होते.यावेळी प्रा.राजेश गायकवाड ,वैभव बापू मस्के , अंकुश शेवंते,ह.भ.प.श्री पिसाळ महाराज यांनी आपली मनोगते व्यक्त केली .

प्रा. गायकवाड यांनी सांगितले की सीना नदीच्या पलीकडील सात गावे विकासापासून पूर्णपणे कशी वंचित राहिलेले आहेत याची सविस्तर माहिती दिली. यावेळी मायाताई झोळ यांचा सत्कार सरपंच विजया मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .शिक्षिका खाडे यांचा सत्कार मनिषा नगरे यांनी केला . धनंजय अडसुळ व अतुल पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गावकऱ्यांनी प्रा .झोळ यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेश गायकवाड यांनी केले तर आभार शाळेचे मुख्याध्यापक गोकुळ कोकाटे यांनी मानले.

## आज खांबाडा येथे मोफत डोळे तपासणी व चष्मे वाटप शिबीर

**वरोरा | प्रतिनिधी**

चला बदल घडवुया अंर्तगत सुप्रसिध्द नेत्रतज्ञ डॉ.चेतन खुटेमाटे यांच्या संकल्पनेतुन गुरुदृष्टी नेत्रालय,चंद्रपूर च्या वतीने खांबाडा येथे रविवार दिनांक ४ ऑगस्ट २०२४ ला मोफत डोळे तपासणी व चष्मे वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उदघाटन प्रकाश शेळकी,सरपंच खांबाडा यांच्या हस्ते होत असुन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.चेतन खुटेमाटे राहणार आहे. प्रमुख अतिथी म्हणुन डॉ.एम.डब्लु.राऊत, गणेश मडावी सरपंच,कोसरसार. नामदेव थाटे सरपंच,बोडखा. चंद्रशेखर चौधरी सरपंच,महालगाव. नानाजी किन्नाके सरपंच वाठोडा. जोत्सना मेश्राम सरपंच, बारव्हा. प्रियंका येलके सरपंच फत्तापूर, विवेक लडी, सरपंच आजनगांव.अंकुश थाटे उपसरपंच वाठोडा, अरविंद शेळकी,पोलीस पाटील खांबाडा. सुनिल गेडाम, अध्यक्ष आदिवासी वि.सहकारी संस्था खांबाडा, अर्चना विनोद झाडे,सामाजीक कार्यकर्ता खांबाळा.प्रमोद वाघ, सामाजीक कार्यकर्ता हे उपस्थित राहणार असुन सदर शिबीराचा लाभ खांबाडा परीसरातील नागरीकांनी घ्यावा असे आवाहान आयोजकांनीकेलेआहे.

# करमाळा भुमी अभिलेख कार्यालयात चाललंय तरी काय ?

## खाजगी व्यक्तीच्या हातात कार्यालयाचा कारभार;चौकशी करण्याची जिल्हा अधीक्षकांकडे मागणी

**करमाळा | प्रा राजेश गायकवाड**

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा भुमिअभिलेख कार्यालया त शासनाचा कर्मचारी असताना खाजगी व्यक्तीकडून संगणकावर सर्व प्रकारच्या नोंदीचे काम उप अधीक्षक भूमि अभिलेख करमाळा यांच्या आशीर्वादाने चालत असून सर्वसामान्य नागरिकांची ह्यात पिळवणूक होत असून याबाबत योग्य ती चौकशी करून संबंधितावर कारवाई करावी अशी लेखी तक्रार जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख सोलापूर यांच्याकडे करमाळा अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारुख जमादार यांनी केली आहे .

यावेळी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की करमाळा भूमी अभिलेख कार्यालयात वारस नोंदी ,बक्षीस पत्र नोंद, हक्क सोड पत्र ,नोंद मृत्युपत्र नोंद ,गहाणखत, आधी अन्य कारणांची नोंद करण्यासाठी खाजगी व्यक्तीकडून हे काम करमाळा उपअधीक्षक भूमी अभिलेख हे करत आहे वास्तविक पाहता या ठिकाणी शासनाने एका कर्मचारी ची नेमणूक केल्याचे समजते या कार्यालयात बेबंद कारभाराच्या संदर्भात अनेक आंदोलने झाली लोकांनी नोटा घेऊन आंदोलन केली अधिकाऱ्याच्या टेबलावर नोटांचे बंडल सुद्धा टाकण्यात आले व काम करा अशा मागण्या करण्यात आल्या होत्या त्यामुळे या विभागातील तात्काळ चौकशी करून खाजगी काम करणाऱ्या इसमाला ताबडतोब हाकलून देण्यात यावे व अधिकृत कामगाराची या ठिकाणी नेमणूक करावी तसेच करमाळा येथील भूमी अभिलेख कार्यालयात उप अधीक्षक रुजू झाल्यापासून मुख्यालयाठिकाणी राहत नसल्याचे समजते शासनाच्या नियमानुसार त्यांनी मुख्यालयाठिकाणी राहणे बंधनकारक असताना ते मुख्यालयी राहत नसल्याचे समजते तरी याबाबत जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सोलापूर यांनी चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई संबंधितावर करावी व आमदार संजय मामा शिंदे यांनी ही याबाबत लक्ष घालण्याची मागणी जमादार यांनी केली आहे.

# पिक विम्याच्या नावाने शेतकऱ्यांची लूट

## चिमूर विधानसभा क्षेत्रात ओला दुष्काळ जाहीर करा

**चिमूर | शेषराव राऊत**

चंद्रपूर जिल्ह्यातील शेवटच्या टोकाला असलेल्या चिमूर विधानसभा क्षेत्रात नुकत्याच झालेल्या तेरा ते चौदा दिवसात सततदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकाची मोठी नुकसान झाले. त्यामध्ये बरेचसे पीक पाण्याखाली येऊन सडले तर काही पावसामुळे खरडून गेले. आणि ग्रामीण भागात बहुसंख्य घरे पावसामुळे अंशता तर काही पूर्णपणे पडली. त्यामुळे चिमूर विधानसभा क्षेत्रातील चिमुर आणि नागभीड तालुक्यावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. आणि अजूनही तालुक्यात सततधार पाऊस चालू असून याचा फटका शेतकरी तसेच गोरगरीब जनतेला बसत आहे. त्यामुळे चिमूर विधानसभा क्षेत्रात ओला दुष्काळ जाहीर करावा तसेच मागील वर्षीचा पिक विमा शेतकऱ्यांना आठ दिवसात देण्यात यावा अशी मागणी स्वतंत्र विदर्भ पक्ष संयोजक व चिमूर विधानसभा क्षेत्र प्रमुख डॉ. हेमंत इसनकर यांनी केली आहे.

**डॉ.हेमंत ईशनकर यांची मागणी**



चिमूर विधानसभा क्षेत्रात विद्यमान आमदार यांनी दहा वर्ष विकासाच्या नावावर सत्ता उपभोगली. परंतु या दहा वर्षांमध्ये शेतकऱ्यांसाठी कोणत्याही सिंचनाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना केव्हा कोरडा दुष्काळ तर केव्हा ओला दुष्काळ याचा सामना करावा लागत. तसेच गरीब जनतेसाठी कोणत्याही विकासात्मक योजना राबविल्या नाही या दहा वर्षांमध्ये फक्त समाज मंदिरे व सभागृहे बांधणे व त्यातून कमिशन कमावणे, साड्या वाटप करून महिलांना खुश करणे, जेवणाचे डबे वाटप करणे, शिलाई मशीन वाटप करणे यापलीकडे आमदारांनी काही केले नाही. याने चिमूर विधानसभा क्षेत्राचा विकास होईल का? असा प्रश्न मतदारांना भेडसावत आहे.

तालुक्यातील शेतकरी पीक विम्याची रक्कम आज बँक खात्यात जमा होणार, उद्या होणार या आशेने शेतकरी पीक विम्याचा रक्कमेची आतुरतेने वाट पाहत आहे. राज्य शासनाने मोठा गाजावाजा करून एक रुपयात पिक विमा योजना सुरू केली. पीक विम्याची रक्कम का आली नाही, किंवा आमच्या पीक विम्याचा काय झालं? तसेच पीक विम्याची माहिती जाणून घेण्यासाठी कृषी रक्षक पोर्टल वर संपर्क करण्यासाठी पाच अंकी नंबर दिला आहे. पाच अंकी नंबर वर शेतकरी संपर्क करुन करुन थकून जात आहे. परंतु काही संपर्क होत नाही. कदाचित एखाद्या शेतकऱ्याचा संपर्क झाला त्या शेतकऱ्याला अर्जा बद्दल संपूर्ण माहिती विचारून घेतले जात आहे. तुमचा अर्ज अप्रोल मध्ये आहे. मी तुमची तक्रार नोंदवली आहे. तुम्हाला या आठवड्यात पीक विम्याची रक्कम जमा होईल. ज्या शेतकऱ्यांचा संपर्क झाला त्या एकाही शेतकऱ्यांचा खात्यात तीन महिने होऊनही एकही रुपया जमा झाले नाही. २६ –२७–२८ जुलै २०२३ या तारखेला अतिवृष्टीमुळे पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. सरकाने शेतकऱ्यांना आव्हान केले होते, त्यानुसार १ रुपयात तालुक्यातील सर्वच शेतकऱ्यांनी पीक विमा काढला. पीक विमा कंपनीचे कर्मचारी शेतकऱ्यांचा बांधावर येऊन पीकांचे नुकसानीची पंचनामे केले. आणि राज्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुद्धा शेतकऱ्याच्या बांधावर येऊन पाहणी करून गेले. परंतु आज पर्यंत बऱ्याच शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळाली नाही. निसर्ग थट्टा करतच असतो परंतु पीक विमा कंपनी आणि सरकार पण शेतकऱ्यां सोबत थट्टा करत आहे. गेल्या काही वर्षापासून नैसर्गिक, आपत्ती, निसर्गाचा लहरीपणा याचा मोठा फटका शेत पिकांना बसत आहे. पिकांना संरक्षण मिळावे या उद्देशाने राज्य शासनाने पीकविमा योजना सुरू केली. गेल्या काही वर्षांपासून हेक्टरी रकमेची अट शिथिल करण्यात आल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. त्यात गेल्या दोन वर्षापासून राज्य शासनाने केवळ एकूण एक रुपयात पिक विमा योजना सुरू केली त्याला शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. पिक विमा योजनेची कामे जिल्हा निहाय इन्शुरन्स कंपन्यांना देण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्याचे काम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडे सोपवण्यात आले. अशा स्थितीत चिमूर तालुक्यातील बऱ्याच शेतकऱ्यांचे अर्ज विमा कंपनीने खारीज केले की काय अशा चिंतेत शेतकरी सापडले आहे. तेव्हा राज्य सरकार हे पिक विमा कंपनीचे कमिशन एजंट आहे का? तालुक्यातील शेतकऱ्यांनचे वाली कोणीच नाही का? असे प्रश्न शेतकऱ्यांसमोर पडले आहे.

त्यामुळे शेतकरी सरकारवर संतापले आहे. सन २०२३–२०२४ या वर्षी भरलेल्या पीक विम्याचा रक्कमेचे काय झाले. त्यासाठी प्रशासनानी पिक विमा कंपनीसोबत व शेतकरी समक्ष तालुक्याच्या ठिकाणी बैठक लाऊन तोडगा काढून शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम आठ दिवसात अदा करावी अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे संयोजक व चिमूर विधानसभा क्षेत्र प्रमुख डॉ. हेमंत इसनकर आणि चिमूर विधानसभा क्षेत्रातील शेतकऱ्यांनी केली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .